महाराष्ट्र शासन

कारागृह व सुधारसेवा विभाग

अपर पोलीस महासंचालनालय व महानिरीक्षणालय,

कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य,

दुसरा मजला, जुनी मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, पुणे-०१.

फोन क्र.: (०२०) २६१२४८१५ E-mail ID- igoffice.hm-mh@gov.in

२६१२७९०६ Web Site : mahaprisons.gov.in

जा.क्र./संवि/शिक्षक/विशेष माफी - परिपत्रक/3722/२०२६ कक्ष-९(क) पुणे-१ दि. .०५.२०२६ 06/05/2026

## परिपत्रक

**राज्यातील कारागृहात शैक्षणिक व इतर विशेष उपक्रमात सहभागी होणाया बंद्यांना शिक्षेत विशेष माफी देणेबाबत .**

वाचा: १. मुख्यालयाचे परिपत्रक क्र. न्यावि/मुख्याध्यापक/शैक्षणिक विशेष माफी/८०७४/ २०१९ कक्ष ९ )क, दिनांक ०३.१०.२०१९

२.मुख्यालयाचे परिपत्रक क्र. न्यावि/मुख्या./शैक्षणिक विशेष माफी/१०३५१/ २०२३ कक्ष ९ )क, दिनांक १६.१०.२०२३

उपरोक्त विषयानुसार कारागृहातील बंदयाचा शैक्षणिक स्तर उंचावणे तसेच त्यांच्यात सामाजिक जबाबदारी व उत्तरदायित्व यांची जाणीव विकसित व्हावी, त्याचप्रमाणे बंद्यांना कारागृहातील शैक्षणिक उपक्रमात सहभागी होण्याबाबत प्रोत्साहित करणेसाठी वरिल नमुद परिपत्रकान्वये बंद्याच्या शैक्षणिक पात्रतेनुसार व गुणवत्तेनुसार त्यांना विशेष माफी देणेबाबत कळविण्यात आले आहे. वाचा या सदराखालील संदर्भिय दोन परिपत्रक रद्द करण्यात येत असून खालील प्रमाणे परिपत्रक निर्गमित करण्यात येत आहे.

बंद्यांना उच्च शिक्षणासाठी तसेच विशेष प्राविण्य (खेळ/स्पर्धा इ. विशेष उपक्रम) याकरिता खालील तक्त्यात नमूद केले नूसार शैक्षणिक अभ्यासक्रम/इतर विशेष उपक्रमाबाबात बंद्यांना कारागृह मुख्यालयामार्फत विशेष माफी देण्यात येईल.

| अ.क्र. | शैक्षणिक अभ्यासक्रम/विशेष उपक्रम | विशेष माफी कालावधी | शेरा |
|---|---|---|---|
| १. | पदवी अभ्यासक्रम | ९० दिवस पर्यंत | कोणत्याही एका पदवी अभ्यासक्रमारिता एकवेळ देण्यात येईल. |
| २. | पदव्युत्तर पदवी | ९० दिवस पर्यंत | कोणत्याही एका पदवी अभ्यासक्रमारिता एकवेळ देण्यात येईल. |
| ३. | एम.फिल/पि.एच.डी./संशोधनात्मक अभ्यासक्रम | ९० दिवस पर्यंत | कोणत्याही एका पदवी अभ्यासक्रमारिता एकवेळ देण्यात येईल. |
| ४. | विशेष प्राविण्य/विशेष कामगिरी (खेळ/स्पर्धा इ. विशेष उपक्रम) | ९० दिवस पर्यंत | ------------------- |

१. पदवी/पदव्युत्तर पदवी/एम.फिल/पि.एच.डी./संशोधनात्मक अभ्यासक्रम तसेच विशेष प्राविण्य/विशेष कामगिरी (खेळ/स्पर्धा इ. विशेष उपक्रम) या करिता मुख्यालयामार्फत घोषीत करण्यात येणारी विशेष माफी ही एकुण शिक्षा कालावधीत **एकत्रित मिळून १८० दिवसापेक्षा जास्त होणार नाही.**

२. विशेष शैक्षणिक माफी मिळणेकरिता विहित केलेला संपुर्ण शैक्षणिक अभ्यासक्रम बंद्याने कारागृहातूनच पूर्ण करणे आवश्यक आहे.

३. विशेष माफी ही केवळ शैक्षणिक अभ्यासक्रम व इतर विशेष उपक्रमाचे अनुषंगाने प्रोत्साहनपर देण्यात येणार असून माफी (remission) ही हक्क नसून केवळ विशेष सवलत आहे.

४. बंद्यांचे शैक्षणिक विशेष माफीबाबतचे प्रस्ताव सादर करतांना कारागृह अधीक्षक यांनी खालील मुद्यांची पूर्तता करुनच परिपूर्ण प्रस्ताव सादर करावा.

- बंद्याचे शैक्षणिक गुणपत्रक/प्रमाणपत्र संबंधीत विद्यापीठांकडुन पडताळणी करुनच प्रस्ताव मुख्यालयास सादर यावा. तसेच सर्व गुणपत्रक व प्रमाणपत्र साक्षांकीत केलेले असावेत.
- बंद्यास शैक्षणिक अथवा इतर विशेष उपक्रमाबाबत यापूर्वी विशेष माफी दिलेली आहे किंवा कसे? याबाबत अधीक्षकांचे प्रमाणपत्र सादर करावे.
- बंद्यांचे शैक्षणिक अथवा इतर विशेष उपक्रमाबाबत बंद्यांचा नामनिर्देशन तक्ता बंद्यांचे संपुर्ण कारागृहीन माहितीसह कारागृह अधीक्षक यांचे यांचे स्वयंस्पष्ट अभिप्रायासह विभागीय कार्यालयामार्फत सादर करण्यात यावा.
- प्रादेशिक कार्यालयाने कारागृहाकडून प्राप्त प्रस्तावाची वरील मुद्यांच्या अनुषंगाने पडताळणी करुन योग्य प्रस्ताव असले बाबत खात्री करुनच **कार्यालय प्रमुखांचे स्वयंस्पष्ट अभिप्रायासह** विशेष माफीबाबतचा प्रस्ताव मुख्यालयास सादर करावा.

५. तसेच उक्त बाबी व्यतिरिक्त १०वी/१२ वी समकक्ष/कोणताही पदविका/प्रमाणपत्र अभ्यासक्रम/प्रशिक्षण इ.बंद्याने कारागृहातून पूर्ण केला असेल तसेच इतर विशेष उपक्रम याबाबत संबंधीत विशेष पोलीस महानिरीक्षक/कारागृह उपमहानिरीक्षक/ कारागृह अधीक्षक, त्यांच्या अधिकारात माफी देणेबाबत उचित निर्णय घेतील.

६. माफी देय असलेल्या बंद्यांनाच विशेष माफी देय राहील.

6/5

**(सुहास वारके)**
अपर पोलीस महासंचालक व
महानिरीक्षक, कारागृह वसुधारसेवा
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

**प्रति,**

१. विशेष पोलिस महानिरीक्षक, दक्षिण विभाग/ छ. संभाजी नगर विभाग
कारागृह उपमहानिरीक्षक , पश्चिम विभाग/ नाशिक विभाग/ पूर्व विभाग

२. कारागृह अधीक्षक (सर्व)

**प्रत :-** मा.अपर मुख्य सचिव गृह विभाग (अ.व.सु.) मंत्रालय, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांना माहितीस्तव सादर.